पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी

२ रा मजला, वैद्यकिय मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी- ४११ ०१८.

कंत्राटी पदभरती जाहिरात

थेट मुलाखत (WALK IN INTERVIEW)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) १५ व्या वित्त आयोग अंतर्गत पॉलिक्लिनिक (Polyclinic) करिता विशेषज्ञ (Part Time) पदे भरण्यासाठी **पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, वैद्यकीय विभाग, दुसरा मजला, पिंपरी- ४११ ०१८ येथे आठवडयातील दर बुधवारी रिक्त जागानुसार महापालिका आवश्यकतेप्रमाणे मुलाखती अयोजित करण्यात येत आहेत.** तरी पात्र व इच्छुक तज्ञ वैदयकिय अधिका-यांनी थेट मुलाखतीस सर्व शैक्षणीक प्रमाणपत्रांचे स्वयंसाक्षांकित एक प्रत, फोटो व मुळ शैक्षणिक प्रमाणपत्रासह उपस्थित रहावे.

Sr.No	Post Name	Required Post	Name Of Center for Posting	Age Limit	Educational Qualification	Remuneration Per Visit (Incentive)
1	Physician	09	Mhetrewasti,Moshi,Yamunangar, Sangavi, Sambhajinagar, Gharkul,Whalekarwadi, Neharungar, Bijalinagar, Dighi UPHC	70 Years	MD Medicine / DNB	To visit once in every week. Rs.2000/- to be paid as fixed amount per visit +Rs.100 per patient checked of his/his specialty to maximum Rs.5000/- visit
2	Obstetrics & Gynecologist	06	Mhetrewasti,Moshi,Yamunangar, Sangavi, Sambhajinagar, Gharkul,Whalekarwadi, Neharungar, Bijalinagar, Dighi UPHC	70 Years	MD/MS Gyn/DGO/DNB	
3	Pediatrician	08	Mhetrewasti,Moshi,Yamunangar, Sangavi, Sambhajinagar, Gharkul,Whalekarwadi, Neharungar, Bijalinagar, Dighi UPHC	70 Years	MD Paed/DCH/DNB	
4	Ophthalmologist	10	Mhetrewasti,Moshi,Yamunangar, Sangavi, Sambhajinagar, Gharkul,Whalekarwadi, Neharungar, Bijalinagar, Dighi UPHC	70 Years	MS Ophthalmologist /DOMS	To visit once in every fortnight Rs. 2000 to be paid as fixed amount per visit + Rs.100 per patient checked of his/her specialty to maximum Rs.5000/- visit
5	Dermatologist	10	Mhetrewasti,Moshi,Yamunangar, Sangavi, Sambhajinagar, Gharkul,Whalekarwadi, Neharungar, Bijalinagar, Dighi UPHC	70 Years	MD (Skin/VD), DVD,DNB	
6	Psychiatrist	10	Bijlinagar, Mhetrewasti,Moshi,Yamunangar, Sangavi, Sambhajinagar, Gharkul,Whalekarwadi, Neharungar, Bijalinagar, Dighi UPHC	70 Years	MD Psychiatry/DPM /DNB	
7	ENT Specialist	10	Mhetrewasti,Moshi,Yamunangar, Sangavi, Sambhajinagar, Gharkul,Whalekarwadi, Neharungar, Bijalinagar, Dighi UPHC	70 Years	MS ENT/DORL/DNB	
	Total	**63**				

अर्ज स्विकारणे विषयक माहिती-

- अर्ज स्विकारण्याचे ठिकाण – वैदयकीय विभाग प्रमुख यांचे कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, दुसरा मजला, वैदयकीय विभाग मुख्य कार्यालय, पिंपरी-१८
- walk in interview साठी उपस्थितीची वेळ- दर बुधवारी दुपारी २.०० ते ५.०० वाजेपर्यंत राहिल.

Job Responsibility of Specialists (Part Time)

i. Attend OPD as per the fixed Schedule.
ii. OPD timing will be for 4 hours om the fixed date.
iii. Record of the all cases examined has to be kept by specialist and submitted to the in charge of the HWC.
iv. Medicines are to be prescribed from the available medicines form HWC, and should not be prescribed from Private medical stores.

अटी व शर्ती-

१) अ.क्र.१ ते ३ या पदाच्या उमेदवारांना To visit once in every week. Rs.2000/- to be paid as fixed amount per visit +Rs.100 per patient checked of his/his specialty to maximum Rs.5000/- visit नुसार मानधन अदा करण्यात येईल. तसेच अ.क्र.४ ते ७ या पदाच्या उमेदवारांना To visit once in every fortnight Rs. 2000/- to be paid as fixed amount per visit + Rs.100 per patient checked of his/her specialty to maximum Rs.5000/- visit नुसार मानधन अदा करण्यात येईल.

२) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्ती ११ महिने २९ दिवासांकरिता असेल.

३) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

४) अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

५) रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी पॉलीक्लिनिक ओपीडीसाठी ठरलेल्या दिनांक व वेळी आपण उपलब्ध असणे आवश्यक राहील.

६) सदर तज्ञांनी पॉलीक्लिनिक ओपीडीमध्ये आलेल्या रुग्णांना त्याच्या खाजगी रुग्णालयात बोलावू नये असे आढळून आल्यास आपणावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

७) उपरोक्त कंत्राटी पदांकरिता वरमहा जाहिरातीमध्ये नमूद केल्यानुसार मानधन देण्यात येईल.

८) सेवानिवृत्त विशेषतज्ञ/अधिकारी यांची निवड झालेस सदर पदाकरिता मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त विहित मार्गदर्शक सुचनांनुसार मोबमाप करुन अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९) जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व नियुक्ती ठिकाणात बदल होऊ शकतो तसेच नियुक्तीच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो, याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत. ऐनवेळी मार्गदर्शक सुचनांनुसार पदसंख्येत बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही.

१०) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

११) एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

१२) एकापेक्षा अधिक पदांकरिता अर्ज करताना अर्जासोबत पदांचा प्राधान्यक्रम मुलाखती पुर्वी या कार्यालयास सादर करावा.

१३) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१४) सदर जाहिरात ही प्रारुप गुणवत्ता यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महापालिकेला गरज भासेल त्याप्रमाणे मार्किंग पॅटर्ननुसार प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार Walk in Interview व्दारे निवड करण्यात येईल. निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

१५) केवळ शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत असणा-या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१६) विशेषज्ञ/अधिकारी कर्मचारी या पदांकरीता शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त विशेषतज्ञ/अधिकारी या पदांकरीता अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजू झालेला दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्ती झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवानिवृत्तीनंतर देय असलेले वेतन (पेन्शन) याबाबतची संपूर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी.

१७) विशेषज्ञ व अति विशेषज्ञ पदासाठी सेवा निवृत्त अधिकारी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे तसेच शारीरीक व मानसिक दृष्टया

सक्षम असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, त्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल.

१८) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१९) उपरोक्त पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील, अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

२०) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

२१) सदर पदभरतीच्या सर्व सुचना बाबत सविस्तर तपशील पिंपरी चिंचवड महानगरपालिका www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच वर्तमानपत्रामध्ये देखील जाहिरात प्रसिध्द करणेत येईल. तसेच याबाबत कोणत्याही उमेदवाराने या कार्यालयास प्रत्यक्ष संपर्क साधु नये.

२२) १५ व्या वित्त आयोगांतर्गत पॉलिक्लिनीक कार्यान्वीत करणेकरिता विशेषज्ञ पदांच्या पदभरतीच्या अनुषंगाने राबविणेची भरतीप्रक्रिया करिता खालील गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

अ.क्र.	तपशिल	अधिकतम गुण
१	Subject Knowledge	१०
२	Research & Academic Knowledge	१०
३	Leadership Quality	१०
४	Administrative Abilities	१०
५	Experience a) For Govt. Experience-2 marks for one year b) For Private Experience-1 marks for one year	१०
एकुण-		५० गुण

❖ खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जाच्या सोबत जोडाव्यात.

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
२) शाळा सोडल्याचा/जन्म तारखेचा दाखला
३) पासपोर्ट आकाराचा फोटो
४) प्रमाणित केलेली शासकिय/निमशासकिय अनुभव प्रमाणपत्रे
५) नावात बदल असलेस त्यासंबंधिचा पुरावा (राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाणपत्र)

सही/-
(डॉ. विजय सुर्यवंशी)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८

(डॉ. लक्ष्मण गोफणे)
आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११०१८

जाहिरात क्र.- ४१/२०२६-२७
दिनांक - १४/०५/२०२६

उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना

फोटो

प्रति,

मा. आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

विषय – ..... या पदासाठी अर्ज
संदर्भ - दि. - -२०२६ रोजीची जाहिरात

महोदय,

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीनुसार मी मनपाचे रुग्णालयामध्ये हंगामी पध्दतीने ..... या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे:

अ.क्र.	तपशील	माहिती								
१	संपुर्ण नाव	आडनाव		नाव			वडील / पतीचे नाव			
२	पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता									
३	ई-मेल						मोबाईल क्र.			
४	जन्मतारीख									
५	लिंग	पुरुष		स्त्री						
६	सद्यस्थितीत महापालिकेत कामकाज करीत आहे काय						होय / नाही			
	होय असल्यास	रुग्णालय/दवाखान्याचे नाव -					पदनाम -			
७	जात -					जातीचा प्रवर्ग -				
	SC	ST	VJ (A)	NT (B)	NT (C)	NT (D)	OBC	SBC	EWS	OPEN
८	शैक्षणिक अर्हतेचा तपशील									
	शैक्षणिक अर्हता	उत्तीर्ण वर्ष		मिळालेले गुण			टक्केवारी			
९	तांत्रिक व इतर अर्हता तपशील									
१०	अनुभव- (केवळ शासकिय/निमशासकिय)									
	अ.क्र.	संस्थेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक					पदनाम		कालावधी	

११) आपणांविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय? चौकटीमध्ये अशी खुण करावी.

होय	नाही

होय असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.

---

१२) अर्जासोबत खालील (छायांकीत) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) .....

२) .....

३).....

४).....

५).....

१३) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय? होय/नाही

१४) अर्जदार सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त आहे काय? होय/नाही

होय असल्यास शासकीय सेवेत रुजू दिनांक.....

पदनाम:- .....

सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त झालेचे दिनांक-.....

सेवानिवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन) .....

सदरची पदे ही तात्पुरत्या / हंगामी स्वरुपातील नेमणुकीची असून ११ महिन्यांकरीताच्या नेमणुकीची आहेत याची मला जाणीव असून याबाबत मी भविष्यात कोठेही व कोणताही दावा दाखल करणार नाही. वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती, तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी / चूकीची अथवा अपुरी असल्याचे आढळून आल्यास नेमणुकीच्या कोणत्याही टप्यावर या माहितीच्या आधारे महापालिका सेवेतून कमी करण्यास तसेच या भरतीकरीताच्या अपात्रतेस मी स्वत: जबाबदार राहिल. याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई देखील केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ - _____

दि. / /२०२६

अर्जदाराची सही -

अर्जदाराचे नाव _____